# ॥ तुका झालासे कळस ॥



गुरुदास

# तुका झालासे कळस

## संत तुकोबाराय यांचे चरित्र

---

**गुरुदास**

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- तुका झालासे कळस-संत तुकोबाराय यांचे चरित्र : गुरुदास

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

# दोन शब्द

**दे**व हा शब्द आपण अनेकदा ऐकतो. घरात, बाहेर, शाळेत. अनेकदा लहान-थोर व्यक्ती, मित्र-मैत्रिणी, आई-वडील, आजी-आजोबा, भाऊ-बहीण या साऱ्यांच्या तोंडून आपण हा शब्द ऐकतो. सणावारी या देवाची आपण पूजा करतो आणि सकाळी किंवा संध्याकाळी घरी किंवा देवळा-राऊळात त्याची प्रार्थनाही म्हणतो. पण हा देव कधी आपल्याला दिसत नाही. आपण त्याला कधी पाहूही शकत नाही. पण तरीही तो आपण कुठेतरी आहे असं मानतो. कारण तशी आपली श्रद्धा असते. पण हा कधीही न दिसणारा देव पहायचा असेल तर तो संत-सत्पुरुषांच्या ठिकाणी नक्की दिसतो. कारण संत-सत्पुरुष हे चालते-बोलते देव असतात. ते माणसाला सुखदुःखात धीर देतात. जगायचं बळ देतात. आपण कसेही असलो तरीही आपल्यावर प्रेम करतात. काहीही न मागता ते जगाला भरभरुन आनंद देतात. खरं तर संत म्हणजे आपल्यावर शीतल सावली धरणारे महावृक्षच असतात.

महाराष्ट्राला अशा संत-सत्पुरुषांची फार मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेतील सर्व साधु-संतांची नामावली सांगायची झाली तर ती कधी संपणारच नाही. म्हणून मग या संतांचे प्रतिनिधी म्हणून संत ज्ञानदेव, नामदेवराय, एकनाथ, तुकोबाराय आणि समर्थ रामदास या पाच संतांचाच प्रामुख्याने आपण उल्लेख करतो. जयजयकार करतो. तशी आपली प्रथाच आहे.

या पाच प्रमुख संतांचे काही अभंग तुम्ही शाळेच्या पाठ्यपुस्तकातून कदाचित वाचले असतील. कदाचित पाठही केले असतील. लहान-मोठ्या सर्वच गायक व गायिकांनी या संतांचे अभंग अतिशय गोड गळ्याने गायलेले आहेत. हे

अभंगही तुम्ही ऐकले असतील. ज्ञानदेवांचं पसायदान तर सर्वच शाळांमधून म्हटलं जातं. मनाचे श्लोक अनेकांना पाठ असतात. समर्थ रामदासांनी रचलेली 'सुखकर्ता, दुःखहर्ता' ही आरती तर सर्वांनाच पाठ असते. नामदेवराय-तुकोबाराय यांचे अभंगही सतत कानी पडतात. संत एकनाथांची भारुडं, त्यातील विनोद, उपहास व विडंबनामुळे आपल्याला खूप आवडतात. 'सत्वर पाव गं मला, भवानी आई रोडगा वाहीन तुला' किंवा 'विंचू चावला, विंचू चावला' ही भारुडं तुम्ही अनेकदा ऐकली असतील.

या संतांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग तुम्ही गोष्टी रुपाने ऐकले असतील. गोष्टींच्या पुस्तकातून हे प्रसंग तुम्ही वाचलेही असतील. घरातील वडीलधाऱ्यांनी, कथा-कीर्तनकारांनी अशा गोष्टी तुम्हाला रसाळ भाषेत सांगून थक्क केलं असेल. पण या संतांची संपूर्ण चरित्रं सर्वांनाच ठाऊक असतील असं नाही. पण ती अनेक लेखकांनी लिहून ठेवली आहेत हे खरं. असं असलं तरीही ही चरित्रं पुन्हा पुन्हा सांगावीशी वाटतात. कारण ती सांगणाऱ्याला आणि ऐकणाऱ्यालाही खूप आनंद देतात. म्हणून ती जाणत्या व संस्कारक्षम वयाच्या मुलांसाठी तसेच सर्वसामान्य श्रद्धावान भाविकांसाठी सोप्या भाषेतून पुस्तक रुपाने लिहावी असं मनोमन वाटलं. साटम उद्योगनेही ती प्रकाशित करण्याचं मनापासून ठरवलं. 'तुका झालासे कळस' हे संत तुकोबाराय यांचे चरित्र या चरित्रमालेतील चौथं चरित्र आहे.

संत चरित्राचा गोडवा मोठा अविट असतो. ते एकदा वाचलं की पुन्हा पुन्हा वाचावंसं वाटतं. जे चरित्रकथा सांगतात त्यांनाही ती वारंवार सांगावीशी वाटते आणि श्रोत्यांनाही न कंटाळता श्रवण करावीशी वाटतात. थोडक्यात संतकथांचा पूर सहसा कधी ओसरत नाही. तो आटतही नाही. उलट त्यातील पुण्य सलील आपल्या देहमनात सदोदित, पिढ्यान्‌पिढ्या झिरपत राहतं.

संत चरित्र वाचली की, आपल्याला एक गोष्ट स्पष्ट कळते आणि ती ही की, संत हे आपल्या सारखेच सामान्य माणूस म्हणून जन्माला येतात. जन्मतः संत म्हणून कोणतीही वेगळी जन्मखूण घेऊन ते येत नाहीत. जगात तसं

उदाहरणही कुठे दिसत नाही. मग ही साधीसुधी सामान्य माणसं पुढील आयुष्यात अलौकिक संत का ठरतात, हा प्रश्न सर्व लहानथोरांच्या मनात दडून असतो. मग या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी आपण संतांची चरित्रं वाचतो. पुन्हा पुन्हा वाचतो. न कंटाळता वाचतो. त्यातून आपल्याला उत्तर मिळो, न मिळो. पण एक गोष्ट खरी की, संतांच्या चरित्रातून खूप काही शिकायला मिळतं. असं खूप खूप की, जे पुस्तकांच्या जगातही नसतं. जगाच्या व्यवहारातही नसतं. ते फक्त जगात डोळे उघडे ठेवून जगण्यात असतं. जगण्याच्या अनुभवात असतं. संत असा माणसाच्या जगण्यापलीकडचा अनुभव जगतात. म्हणून त्यांना माणूसपणी देवपण लाभतं. मग ते माणसालाही देवपणाकडे घेऊन जातात. माणूसपणाला देवपणाकडे नेणारे देवदूत होऊन जातात. ते तुम्हा-आम्हाला जेवढं स्वच्छपणे पाहतात तितक्याच स्वच्छ-निर्मळपणे देवालाही बघू शकतात. म्हणून संतांना आपण चालते बोलते देव म्हणतो.

संत ज्ञानदेवांनीच एका अभंगात निर्वाणीने संतांची महती सांगून ठेवलीय. ज्ञानदेव सांगतात की,

*या संतांसी भेटतां । सरे संसाराची व्यथा ।*
*पुढतां पुढती माथां । अखंडित ठेवीन ।।*
*या संतांचें देणें । कल्पतरुहूनि दुणे ।*
*परिसा परीस अगाध देणें । चिंतामणी ठेंगणा ।।*
*या संतांपरीस उदार । त्रिभुवनीं नाहीं थोर ।*
*मायबाप सहोदर । इष्टमित्र सोयरे ।।*

संतकथेने मनाची मरगळ दूर होते. अंतःकरणाचा मळ दूर होतो. आनंदाने चित्त अपरंपार भरुन जातं. असा आनंद की, जो पैसे देऊनही जगात कुठे मिळत नाही. अनेकदा खूपसं शिकायला मिळतं. हाच उद्देश ठेवून 'तुका झालासे कळस' हे संत तुकोबाराय यांचं चरित्र लिहिलं आहे. तुम्हास ते आवडावं हा विश्वास !

**- गुरुदास**